दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

वर्ष : ०४, अंक : २९०
पाने : ०४, किंमत : ०३ रुपये
संपादक : विनोद कैलास गोरे
RNI NO. : MAHMAR/2022/82056
Follow Us On : www.aksharaj.in
Email : newsaksharaj2021@gmail.com

बुलडाणा, रविवार, दि.०१ जून २०२५





## थोडक्यात

### तुळजापुरात लोकसहभागातून साकारला जाणार भव्य पुतळा

#### आ.राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडून १ लक्ष देणगी



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.३१, धाराशिव :** काळाच्या पटलावर राजमाता आहिल्यादेवी होळकर यांनी स्वतः च्या कर्तृत्वाने अभिमानास्पद आणि प्रेरणादायी आलेख कोरला आहे. आहिल्यादेवी या खऱ्या अर्थाने स्त्री सक्षमीकरणाचे अमूल्य असे प्रेरणास्थान आहेत. तुळजापूरमध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे भव्य स्मारक साकारण्यात येणार आहे. हे केवळ स्मारक नसून त्याठिकाणी अद्ययावत प्रेरणा केंद्र आणि मदत केंद्रही उभारण्याची योजना असल्याचे सांगत लोकसहभागातून पुतळा उभारणीसाठी निधी संकलनाची सुरुवात म्हणून आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी शनिवारी एक लाख रुपयांचा सक्रिय सहभाग दिला.

पुण्यश्लोक राजमातांच्या भव्य स्मारकासाठी एक कोटी रुपयांचा निधी यापूर्वीच उपलब्ध झाला आहे. त्यातूनच हे भव्य स्मारक उभारण्यात येणार आहे. या स्मारकात केवळ पुतळाच नव्हे, तर प्रेरणा केंद्र आणि मदत केंद्रही उभारण्याची योजना आहे. यासाठी सर्वांनी सक्रिय सहभाग देण्याचे आवाहन आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी केले. याप्रसंगी पुतळा हा लोकसहभागातून उभा करण्याचा निर्धार करण्यात आला व लोकसहभागातून निधी संकलनही सुरू करण्यात आले. प्रारंभी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी स्वतः ₹१,००,०००/-चा निधी देत या लोकसहभाग कार्याचा शुभारंभ केला. अठराव्या शतकात स्त्रियांना सामाजिक बंधनांत अडकवले गेले असताना, पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांनी स्त्री सक्षमीकरणाचे उदात्त कार्य उभारले. त्यांनी सुरू केलेल्या महेश्वरी साडी उद्योगाने महिलांना केवळ आर्थिक स्वावलंबनच दिले नाही, तर स्वाभिमान व आत्मसन्मानाचे भानही दिले. महेश्वर येथे कुशल विणकरांना बोलावून, स्थानिक महिलांना प्रशिक्षण देत त्यांनी समाजात क्रांतिकारी बदल घडवून आणला असल्याचेही आमदार पाटील यांनी यावेळी सांगितले. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकरांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी तुळजापूर येथील छत्रपती संभाजी महाराज उद्यानाशेजारी भव्य स्मारक उभारण्यात येत आहे. ऑक्टोबर २०२४ मध्ये या स्मारकाचे भूमिपूजन झाले व कामास सुरुवात देखील झाली आहे.जयंतीच्या औचित्य साधत त्या कामाची आमदार पाटील पाहणी देखील केली.मागील पाच दशकांपासून स्थानिक पातळीवर या पुतळ्याची मागणी होत होती, ती अखेर आमदार राणाजगजितसिंह पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे पूर्णत्वास जात आहे. हे स्मारक माझे आहे, त्याच्या बांधणीत माझा सहभाग आहे, असे प्रत्येक नागरिकाला वाटायला हवे, असे आवाहन आमदार पाटील यांनी केले. तुळजाभवानीच्या दर्शनासाठी येणाऱ्या प्रत्येक भाविकांना हे स्मारक प्रेरणादायी ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. हे स्मारक केवळ ऐतिहासिक नव्हे, तर सामाजिक आणि आध्यात्मिक जागृतीचे केंद्र ठरेल. सुशासन, न्याय आणि अध्यात्म यांचे प्रतीक असलेल्या अहिल्याबाई होळकरांच्या विचारांचा वारसा पुढील पिढ्यांपर्यंत पोहचवण्याचे हे एक सशक्त पाऊल ठरेल, असा विश्वास ही आमदार पाटील यांनी व्यक्त केला आहे.

### विवाहितेला छळले ! दोरीने बांधून शोल्डरचे चटके दिले




**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, छ.संभाजीनगर :** 'माहेरून पैसे घेऊन ये' असं म्हणत ३० वर्षीय विवाहितेला घरात बांधून बेदम मारहाण करण्यात आली. एवढेच नाही तर दोरीने बांधून शोल्डरचे चटके दिले. सासरच्या लोकांकडून झालेल्या निर्दयी मारहाणीमध्ये विवाहिता गंभीर जखमी झाली आहे. ही घटना फुलंब्री तालुक्यातील चौका वाडी येथे घडली. याप्रकरणी फुलंब्री पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विवाहितेला पैशांसाठी छळण्याच्या धक्कादायक घटना दिवसेंदिवस उघड होत आहेत.

वृत्तानुसार, अजीम अब्दुल शेख (रा. चौका वाडी तालुका फुलंब्री) असे आरोपी पतीचे नाव आहे. याप्रकरणी अजीमसह तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी ३० वर्षीय (सानिया) पीडित महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, काही वर्षांपूर्वी सानिया यांचा अजीम शेखसोबत विवाह झाला. दोघांना एक मुलगा आहे. लग्नानंतर काही दिवस चांगली वागणूक दिल्यानंतर पती अजीम शेख हा पत्नी सानिया हिला त्रास देऊ लागला. माहेरून पैसे घेऊन ये अशी मागणी करत तो सतत मारहाण व शिवीगाळ करत असे. दीड वर्षांपूर्वी सानिया गर्भवती असताना अजीमने तिच्या पोटावरही मारहाण केली होती. यामध्ये गर्भात असलेल्या बाळाला दुखापत झाली होती. यामुळे छत्रपती संभाजीनगर शहरातील एका खाजगी रुग्णालयात तिचा गर्भपात करण्यात आला.

दरम्यान, सानियाच्या माहेरी नातेवाईकांचं लग्न असल्याने तिचे कुंटुंबीय तिला माहेरी घेऊन जाण्यासाठी आले. यावेळी सानिया एका खोलीत डांबून ठेवलेल्या अवस्थेत आढळून आली. वडिलांनी विचारपूस केली असता आणि अक्षरशः ढसाढसा रडू लागली. हंबरडा फोडून तिने आपबीती सांगितली. पतीने दोरीने बांधून बेदम मारहाण केली. दोरीला बांधलेल्या अवस्थेत शोल्डरने गरम करून गळ्यावर, हातावर, पायावर यासह इतर भागांवर चटके दिले. मुलीवर झालेल्या अन्याय अत्याचाराच्या नंतर सानियाच्या वडिलांनी मुलीला घेऊन तात्काळ फुलंब्री पोलीस ठाणे गाठले. याप्रकरणी पती अजीम याच्यासह दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## करोनाचा फैलाव वाढला ! राज्यातील रुग्णसंख्येने चिंतेत भर !!



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, नवी दिल्ली :** भारतात करोना रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या ३० मे २०२५ च्या आकडेवारीनुसार, देशातील सक्रिय रुग्णांची संख्या २,७१० वर पोहोचली आहे.देशात सर्वाधिक सक्रिय कोविड-१ चे रुग्ण केरळमध्ये आहेत. तिथे १,१४७ लोकांना लागण झाली आहे. त्यानंतर महाराष्ट्रात ४६७, दिल्लीत २९४ आणि गुजरातमध्ये २२३ रुग्ण आहेत.

**महाराष्ट्रात ८४ नवे रुग्ण आढळले**

महाराष्ट्राच्या सार्वजनिक आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, राज्यात कोविड-१९ चे ८४ नवीन रुग्ण आढळले आहेत. ८४ रुग्णांपैकी ३२ रुग्ण मुंबईत आढळले. ठाणे महापालिका क्षेत्रात १४ रुग्ण, ठाणे ग्रामीण २ रुग्ण, नवी मुंबई, कल्याण डोंबिवलीत १, रायगडमध्ये २ रुग्ण, नाशकात १ रुग्ण, १९रुग्ण पुणे महापालिका क्षेत्रात साताऱ्यात दोन रुग्ण, कोल्हापूरात २ रुग्ण, सांगलीत ३ रुग्ण इत्यादींचा समावेश आहे. त्यामुळे यावर्षी राज्यात करोनामुळे बाधित झालेल्या लोकांची संख्या ६८१ झाली आहे. सध्या राज्यात ४६७ सक्रिय रुग्ण आहेत.

**करोनामुळे घाबरू नका...**

थकज च्या माजी मुख्य वैज्ञानिक सौम्या स्वामीनाथन यांनी करोनाच्या वाढत्या रुग्णांवर प्रतिक्रिया दिली आहे. त्या म्हणाल्या, यामुळे घाबरण्याची गरज नाही. करोना व्हायरस भविष्यातही आपल्यासोबतच राहणार आहे. काही महिन्यांच्या अंतराने कोविड-१९ च्या रुग्णांमध्ये वाढ होईल. आपल्याकडे चांगली रोगप्रतिकारशक्ती आहे. लसीकरणामुळे आपल्याला अधिक संरक्षण मिळते. त्यामुळे करोनामुळे होणारा संसर्ग आता खूप सौम्य आहे.

**लक्षणांवर आधारित उपचार, अँटिबायोटिकची गरज कधी**

त्या म्हणाल्या, व्हायरल इन्फेक्शनवर अँटिबायोटिक औषधांचा काहीही परिणाम होत नाही. मग तो कोविड असो, इन्फ्लूएंझा असो किंवा श्वसनमार्गाचा कोणताही व्हायरस असो. अशावेळी फक्त लक्षणांवर आधारित उपचार घ्या. तुम्ही गरम पाणी पिऊ शकता, गुळण्या करू शकता, त्याने आराम मिळतो. जेव्हा सेकंडरी बॅक्टेरियल इन्फेक्शन होते, तेव्हाच अँटिबायोटिक्सची गरज असते.

तज्ञांच्या मतानुसार करोनाची गंभीर परिस्थिती नाही, त्यामुळे घाबरण्याची गरज नाही. योग्य वेळी डॉक्टरांचा सल्ला घ्या आणि त्यांनी सांगितलेली औषधे नियमित घ्या.करोनाचा संसर्ग टाळण्यासाठी मास्क वापरा आणि सामाजिक अंतर राखा. वारंवार आपले हात साबणाने धुवा.

## डोंबिवली पलावा ब्रिज संदर्भात उबाठा व मनसेचे संयुक्त आंदोलन



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३१, डोंबिवली (ठाणे) :** डोंबिवली पलावा ब्रिज लवकरात लवकर सुरू व्हावा या मागणीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष व महाराष्ट्र नवनिर्माण सेना या दोन्ही पक्षांनी एकत्र येत जोरदार आंदोलन केले.

सरकार ७ वर्षांपासून या पुलाचे काम अपूर्ण ठेवून वेळ काढूपणा करत आहे. या पुलासाठी कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर होऊन ही अद्याप काम पूर्ण झाले नाही. वारंवार सरकार तारीख बदलून, गाजर दाखवून जनतेची फसवणूक करत आहे, याचा निषेध करण्यासाठी दोन्ही पक्षांनी एकत्र येऊन आंदोलनाचे आयोजन केले.

या ऐतिहासिक आंदोलनामुळे कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. अनेक कार्यकर्त्यांनी येणाऱ्या काळात दोन्ही पक्षांनी श्रेष्ठ पातळीवर एकत्र येऊन युती करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. आंदोलना दरम्यान पक्षाच्या स्थानिक नेत्यांनी सरकारवर जोरदार टीका केली आणि येत्या काळात जर पुलाचे काम त्वरित पूर्ण झाले नाही, तर अधिक तीव्र आंदोलनाचा इशारा दिला.

डोंबिवली आणि पलावा परिसरातील रहिवाशांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी हा ब्रिज तात्काळ सुरू होणे अत्यंत आवश्यक असल्याचे दोन्ही पक्षांनी स्पष्ट केले.

यावेळी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे कल्याण जिल्हाप्रमुख दीपेश म्हात्रे, मनसे नेते व माजी आमदार राजू पाटील, कल्याण जिल्हा संघटक तात्या माने, कल्याण जिल्हा महिला संघटिका वैशाली राणे-दरेकर, कल्याण ग्रामीण विधानसभा प्रमुख रोहिदास मंडे, विधानसभा संघटक सदाशिव गायकर, तालुकाप्रमुख विजय भोईर, तालुका संघटक भगवान पाटील, उपतालुकाप्रमुख मुकेश भोईर, मनसे प्रदेश उपाध्यक्षा दिपिका पेडणेकर, जिल्हा अध्यक्ष प्रकाश भोईर, जिल्हा संघटक हर्षद पाटील, शहर अध्यक्ष राहुल कामत, उपजिल्हा अध्यक्ष सुदेश चुडनाइक, योगेश पाटील, शहर संघटक तकदीर काळण, विधानसभा सचिव अरुण जांभळे, उपशहराध्यक्ष प्रभाकर जाधव, शहर सचिव कोमल पाटील सर्व विभाग अध्यक्ष व शिवसेना विभाग प्रमुख शाखाप्रमुख उपस्थित होते.

## पुण्यात भरधाव कारने १२ जणांना उडवलं...



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, पुणे :** पुण्यात अपघाताच्या घटना काही केल्या कमी होताना दिसत नाही. पुण्याच्या कल्याणीनगर येथील पोर्शे कार घटनेला काही महिने होत असतानाच आता आणखी एक धक्कादायक अपघाताची घटना समोर येत आहे. कल्याणीनगर येथील पोर्शे कार अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला होता.

या घटनेमुळे संपूर्ण राज्य हादरलं होतं. यानंतर आज झालेल्या अपघातात १२ जणांना उडवल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. या अपघातात जखमी झालेल्यांबाबत महत्त्वाची माहिती समोर येत आहे. भरधाव कारने १२ जणांना उडवलं. यापैकी ३ जणांची प्रकृती गंभीर असल्याची माहिती मिळत आहे. तर एका जणाचा पाय फ्रॅक्चर झाल्याची माहिती मिळत आहे. संबंधित व्यक्तीच्या पायावर तातडीने शस्त्रक्रिया केली जात असल्याची माहिती मिळत आहे.

पुणे हे विद्येचं माहेरघर आहे. इथे एमपीएससीचा अभ्यास करणारे हजारो विद्यार्थी राज्यभरातून येतात. अधिकारी बनण्याचं स्वप्न उराशी घेऊन पुण्यात दिवस-रात्र अभ्यास करतात. हे विद्यार्थी तासंतास पुण्यातील अभ्यासिकांमध्ये अभ्यास करत बसलेले असतात. पण आज अशाच काही विद्यार्थ्यांना खूप दुर्दैवी घटनेला सामोरं जावं लागलं आहे. या घटनेमुळे विद्यार्थी वर्गात मोठी खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे पुण्याच्या अतिशय मध्यवर्ती भागात असलेल्या सदाशिव पेठेत अपघाताची घटना घडली आहे. या भागात अनेक अभ्यासिका आहेत. या अभ्यासिकांमध्ये शेकडो विद्यार्थी तासंतास अभ्यास करत असतात. या दरम्यान आज (शुक्रवारी) संध्याकाळी साडेपाच वाजेच्या सुमारास काही विद्यार्थी श्री साईनाथ अमृततुल्य या चहाच्या दुकानावर चहा पिण्यासाठी आले होते.

विद्यार्थ्यांचा मोठा घोळका या चहाच्या दुकानाबाहेर होता. पण हा घोळका न पाहता एका भरधाव कारने विद्यार्थ्यांना उडवलं. अपघाताची ही मोठी दुर्घटना असल्याची माहिती आहे. कारण या अपघातात १२ जण जखमी झाले आहेत. त्यापैकी ३ जण गंभीर असल्याची माहिती आहे.

**३ गंभीर रुग्णांवर संचेती रुग्णालयात उपचार सुरु**

मिळालेल्या माहितीनुसार, ३ गंभीर रुग्णांना संचेती रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. तर उर्वरित ९ जखमींना मोडक रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे. यापैकी एकाच्या पायाचं हाड मोडलं आहे. त्याच्या पायावर शस्त्रक्रिया केली जाणार असल्याची माहिती आहे. तर इतर ८ जण हे किरकोळ जखमी झाल्याची माहिती आहे.

या घटनेनंतर पोलिसांकडून कारवाई केली जात आहे. घटनेनंतर विश्रामबाग पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी घटनास्थळी काय घडली याबाबत सविस्तर माहिती घेतली. घटना घडली त्या परिसरातील सीसीटीव्हीची पाहणी केली जाण्याची शक्यता आहे. पोलिसांनी या घटनेतील भरधाव कारचालकाला आणि त्याच्यासोबतच्या सहप्रवाशाला ताब्यात घेतलं आहे. कारचालकावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आल्याची माहिती मिळत आहे.

# संपादकीय



## लालपरीला वाढदिवसाच्या शुभेच्छा

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाची जीवनवाहिनी समजल्या जाणाऱ्या एसटीचा आज म्हणजे १ जूनला ७७ वा वाढदिवस आहे. १ जून १९४८ रोजी पुणे - नगर या मार्गावर पहिली एसटी धावली होती. आज एसटी महामंडळाचा विस्तार झाला आहे. गाव तेथे एसटी, रस्ता तिथे एसटी या ब्रीदवाक्यनुसार एसटीचा विस्तार होत गेला. गावागावात आज एसटी पोहचली आहे. एकूण ३१ विभागातून एसटीचे कामकाज केले जाते त्याचप्रमाणे आंतरराज्यीय सेवा देखील पुरवली जातेय. कर्नाटक, गोवा, आंध्रप्रदेश, तेलंगणा, गुजरात, मध्यप्रदेश या राज्यात आज एसटी पोहचली आहे. राज्यातील कोट्यवधी प्रवाशांच्या लाडक्या लालपरीने काळानुसार कात टाकली असून, अनेक बदलही केले आहेत. लालपरीपासून हिरकणी, शिवनेरी, शिवशाही आता विठाई असा एसटीचा चेहरामोहरा बदलत गेला आहे. एसटी म्हणजे केवळ प्रवाशांची वाहतूक एव्हढेच मर्यादित नसून एसटीने सातत्याने सामाजिक बांधिलकी जपली आहे. राज्यावर आलेल्या भूकंप, दुष्काळ यासारख्या नैसर्गिक आपत्तीत एसटीने नेहमीच मदतीचा हात पुढे केला आहे. मुलींना शिक्षणाच्या प्रवाहात राहता यावे यासाठी एसटीने पुढाकार घेत प्रवासात सवलती दिल्या आहेत. खेड्यापासून शाळा कॉलेजमध्ये जाण्यासाठी विद्यार्थ्यांचे हक्काचे वाहन म्हणजे एसटीच. ग्रामीण भागातील करोडो विद्यार्थ्यांचे शिक्षण केवळ एसटीमुळेच पूर्ण होऊ शकले. म्हणूनच राज्यातील करोडो प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आदराची भावना आहे. एसटी म्हणजे ग्रामीण भागासाठी वरदानच आहे. ग्रामीण भागात आजही एसटी हेच दळणवळणाचे प्रमुख साधन आहे. जनतेचा प्रवास सुखकर व्हावा, प्रवाशांना तत्पर आणि वक्तशीर सेवा मिळावी यासाठी एसटीचे कर्मचारी झटत असतात पण गेल्या काही वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात असल्याने एसटी कर्मचाऱ्यांचे भवितव्य अंधकारात बुडाले आहे. गेल्या अनेक वर्षांपासून एसटी महामंडळ तोट्यात आहे त्यामुळे महामंडळाने नवीन कर्मचाऱ्यांची भरती केलेली नाही. कंत्राटी पदे भरून एसटीचे खाजगीकरण करण्याचा अट्टाहास केला जात आहे त्यामुळे कर्मचारी आणि महामंडळ यांच्यातील वाद विकोपाला गेला आहे या वादात प्रवाशी मात्र भरडले जात आहेत म्हणूनच सरकारने एसटीच्या खाजगिकरणाचा अट्टाहास सोडून एसटीला सशक्त करण्यासाठी प्रयत्न करायला हवेत. कंत्राटी ऐवजी कायमस्वरूपी कर्मचारी नेमून त्यांना इतर शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतन आणि सुविधा दिल्यास महामंडळाला पुन्हा सुगीचे दिवस येतील. प्रवाशांच्या मनात एसटी विषयी आपुलकीची आणि आदराची भावना आहे. सरकारनेही एसटी कडे आपुलकीने पाहिल्यास एसटीला पुन्हा गतवैभव प्राप्त होईल. राज्यातील प्रवाशांच्या मनात मानाचे स्थान असलेल्या आणि सर्वांच्या लाडक्या लालपरीला म्हणजेच एसटीला ७७ व्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!


# सावधान 'तो' परत येत आहे...

**अनंत बोरसे**
**शहापूर जिल्हा ठाणे**
**९१५८४१५०३७**

'कोरोना 'हे तीन शब्द ऐकले तरी मनात चलबिचल होते, अस्वस्थता वाढते, आणि सगळ्यांचेच कान टवकारतात, सगळ्या यंत्रणा सतर्क होतात आणि सगळीकडे त्याचीच चर्चा होते. याला कारण ही तसेच आहे, २०१९ वर्षे संपत असतांनाच 'कोरोना' सारख्या जागतिक महामारीने संपुर्ण जगालाच चिंतेत टाकले होते, जगरहाटीच विस्कळीत करुन टाकली होते जगातील फार मोजकेच देश कोरोना संकटापासून वाचले होते. जगाला पडलेले ते एक दुस्वपन्नच होते.

चार पाच वर्षांनंतर देखील जग अजुन पुर्ण सावरू शकले नाही. भारतात देखील आपण सगळ्यांनीच 'कोरोना' कहराचा कटु अनुभव घेतला. मास्क ची सक्ती, कोरोंटाईनचा काळ हा तर अनेकांसाठी भयानक अनुभव होता.टाळ्या थाळ्या वाजविण्याचे झालेले हास्यास्पद प्रयोग, औषधोपचारांबाबत, लसी बाबत केले गेलेले वेगवेगळे दावे, राजकीय पक्ष, नेत्यांमधील तु-तु-मै-मै, केंद्र सरकार आणि राज्य सरकार यांच्यातील श्रेयवाद, पहिल्यांदाच लॉक डाऊन च्या निमित्ताने ठप्प झालेला महाराष्ट्र, भारत, या निमित्ताने झालेले अनेक मृत्यू, वेठीस धरले गेलेले जनजीवन हे सगळे अभूतपूर्वच होते. औषधे मिळवण्यासाठी, हॉस्पिटल मधे बेड मिळवण्यासाठी, ऑक्सिजन सिलेंडर मिळवण्यासाठी करावी लागणारी वणवण, या निमित्ताने संकटात लुटीची संधी शोधणाऱ्या अनेक महाभागांनी केलेली जनतेची लुट, प्रशासनाचा अतिरेकीपणा, गलथानपणा,एखाद्या साधा शिंकला तरी आजुबाजुला टवकाणारे कान आणि जणु काही शिंकणारा गुन्हेगारच आहे.

या दृष्टिकोनातून त्याच्या कडे पाहिले जाणे, एखाद्याचा मृत्यू झाला तर त्याच्यावर अंत्यसंस्कार करतांना अछुतपणाचा केला जाणारा अतिरेकीपणा, झालेली अवहेलना, कुठे नदीत तरंगणारी प्रेते दिसली तर कुठे अर्धवट जळालेल्या अवस्थेत दिसली. या निमित्ताने आरोग्य व्यवस्थेची वेशीवर टांगली गेलेली लक्तरे हा अनुभवच अनोखा होता. कोरोना काळात एका विशिष्ट धर्मियांना लक्ष करुन देशद्रोही ठरविण्याचे राजकारण देखील झाले, नेहमीप्रमाणे माध्यमातील काहींनी आगीत तेल ओतण्याचे देखील काम केले. कोरोना काळात मदत करण्यात देखील राजकारण केले गेले. अनेकांनी कुठलही मागचा पुढचा विचार न करता कोणाच्यातरी सांगण्यावरून काढे पिले आणि आपले तोंड भाजुन घेतले. जवळपास सगळेच आरोग्य तज्ञ असल्याप्रमाणे एकमेकांना सल्ले देत होते. कोरोना वर नेमका कोणता औषधोपचार लागु होतो हे माहित नसतांनाही अनेकांनी आपली दुकानदारी चालवित बक्कळ पैसा कमावला. कोरोनील सारख्या औषधाची जाहिरातबाजी



तर मंत्री करत होते. कोरोना व्यवस्थापनाच्या नावाखाली कंत्राटदारी, कमिशनखोरी भरपुर झाली.शिक्षण क्षेत्राचे तर वेळापत्रकच बिघडले या निमित्ताने अगोदरच घसरलेल्या दर्जा अधिकच घसरला. लाखो मृत्यू होऊन देखील याबाबतची खरी आकडेवारी सरकारने जाहीर केली नाही. या निमित्ताने घिसाडघाईने पीएम केअर्स फंड निर्माण करण्यात आला, तो सरकारी कि खाजगी याचा वाद रंगला, त्याचा हिशेब काही लागेना कि कोणी त्याचा हिशेब देईना. असे असले तरी अनेकांमधील माणुसकी देखील दिसली, जात धर्म पंथ बाजुला ठेवुन एकमेकांना आधार देण्यासाठी लाखो हात पुढे आले होते, तन मन धन अर्पण करून समाजसेवा करणारेही अनेकजण दिसले. अगोदरच नोटबंदीचा अर्थ व्यवस्थेवर झालेला विपरित परिणाम त्याच कोरोना संकटाने पडलेली भर हे सगळे आव्हानात्मकच होते. मात्र २०२१ पासुन कोरोनाचा प्रभाव काहिसा कमी झाला आणि जगाने सुस्कारा सोडला असे असले तरी कोरोना चे नवनवीन प्रकार अधुन मधुन येतच आहेत.

आता पुन्हा एकदा जगातील काही देशात आणि भारतात देखील कोरोना ची चाहुल लागली आहे मात्र सुदैवाने 'तो' ईतका गंभीर नाही आणि घरातच ऊपचाराने बरा होतो ही समाधानाची बाब आहे. नवीन कोरोना व्हायरंट जे एन-१ हा एन बी १-८-१,आणि एल एफ-७ या ऊप प्रकारांमुळे तयार झाल्याचा अंदाज आरोग्य विषयक तज्ञांनी व्यक्त केला आहे. राज्यातील रुग्णांची संख्या जवळपास सहाशे पर्यंत पोहचली आहे. देशभरात देखील रुग्णांची संख्या झपाटय़ाने वाढत आहे. मागील अनूभव लक्षात घेता आपले शासन-प्रशासन, आरोग्य यंत्रणा या सतर्क झाल्याअसुन कामाला लागल्या आहेत. महाराष्ट्रात सध्या कोरोनाचा प्रभाव मुंबईत जास्त दिसतो. काही दिवसांपूर्वी ठाण्यात एका तर बंगळुरू मधे एका रूग्णाचा मृत्यू झाला आहे. राजस्थान मधे देखील एकाचा मृत्यू झाला आहे. कोरोना येत असतांनाच आता मान्सुन देखील दाखल झाला आहे त्यामुळे कोरोना अधिक वेगाने फैलाव शकतो मात्र 'तो 'इतका गंभीर नाही. आतातर आपल्या कडे लस तसेच इतर ऊपाय ऊपलब्ध आहेत. मात्र आपण देखील काळजी घेतली पाहिजे शासन- प्रशासन आरोग्य यंत्रणाकडुन येणाऱ्या सुचनांचे पालन केले पाहिजे. महत्त्वाचे म्हणजे कोणीही पॅनिक होऊ नये कि अफवांवर विश्वास ठेवु नये कि ठोस माहिति नसतांना अफवा पसरवु नये. काळजी घ्या - कोरोना टाळा.

# अवैद्य गांजा विक्री करणाऱ्या तरुणास केल जेरबंद

**अक्षराज : सुनील क्षिरसागर**

**दि.३१, विंचूर (नाशिक) :** जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील यांनी अमली पदार्थ बाळगणाऱ्या व विक्री करणाऱ्या विरुद्ध मोहिम राबवून जिल्ह्यातील अमली पदार्थ उच्चाटन करून या संपूर्ण नाशिक ग्रामीण जिल्ह्यात कारवाई करणे कामे सूचना दिल्या होत्या.

तसेच अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर उपविभागीय पोलीस अधिकारी पालवे यांच्या सूचनेप्रमाणे नुकतीच निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव यांना मिळालेल्या गुप्त बातमीप्रमाणे गाजरवाडी शिंदे वस्ती परिसरात एक ईसम अवैद्य गांजाची विक्री करत असल्याची माहिती मिळाली होती.

त्याप्रमाणे निफाड पोलिसांनी शिंदे वस्ती गाजरवाडी परिसरात छापा टाकून इसम गिरीश



शरद शिंदे वय २२ राहणार गाजरवाडी, शिंदे वस्ती, तालुका निफाड, जिल्हा नाशिक यास ताब्यात घेऊन कब्जातून १८५००० किंमतीचा ९ किलो ग्राम २६३ वजनाच्या गांजा जप्त केला.

सदर ईसम हा विनापरवाना बेकायदेशीररित्या मानवी मनावर विपरीत परिणाम करणारा गांजा नावाचा अमली पदार्थ कब्जात बाळगून विक्री करताना मिळून आला असून, त्याचे विरुद्ध निफाड पोलीस ठाणे येथे गुन्हा नंबर १६७ / २०२५ एन.डी.पी. एस. कायदा कलम ८ (क) २० ब प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे. सदर कारवाई नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अप्पर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. निलेश पालवे व उपविभाग यांच्या मार्गदर्शनाखाली निफाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश गुरव, स पो.नि ईश्वर पाटील, पोलीस हवालदार अनिल शेरेकर, पोलीस हवालदार कपालेश्वर ढिकले,पोलीस हवालदार भास्कर पवार, महिला पोलीस सोनाली शिंदे व पोलीस नाईक सांगळे, पो.शिपाई विनोद जाधव, पोलीस शिपाई राजेंद्र दराडे, पोलीस शिपाई विक्रम लहाने, पोलीस हवालदार रंगनाथ सानप, तांत्रिक विश्लेषण विभागातील पोलीस हवालदार हेमंत गिलबिले व प्रदीप बहिरम यांच्या पथकाने वरील गुन्ह्यातील अमली पदार्थ गांजा हसतगत केला आहे. व पुढील तपास करत आहेत.

## विचारा स्वतःला

चारचौघात वावरताना
नावे ठेवतो दुसऱ्याला
आपण आहोत कसे?
विचारा स्वतःला

हा रागीट तो तापट
हा वाईट तो चांगला
आपला स्वभाव कसा?
विचारा स्वतःला

हा भांडकुदळ तो कामचुकार
हा स्वार्थी तो हपापलेला
आपण वागतो कसे?
विचारा स्वतःला

नातलग असले मित्र तसले
एक नाही कामाचा
धावतो का इतरांच्या मदतीला?
विचारा स्वतःला

शेजारी असा गावकरी तसे
कंजूस सगळे व्यवहाराला
आपण किती मोठ्या मनाचे?
विचारा स्वतःला

जातभाई स्वार्थी निव्वळ
सहकारी बोलतात पोकळ
आपण कसे आहोत वागायला?
विचारा स्वतःला

**- बबन दामोदर गुळवे**
**जि.लातूर.मो.९७३०९३९७३२.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

## हट्टाहास..

इमारत धोकादायी
जरा हट्टाहास सोडा
जीव असे महत्वाचा
विचार करावा थोडा

गोडजुन्या आठवणी
हळूवार सूरांस छेडा
निघेना पाऊल इथून
मनाला घातला वेढा

भुसभुशीत हो भिंती
पायथ्याले मोठातडा
वाळूच्या विश्वासावर
संसार डोलारा खडा

जुनाटचाळी चाळणी
पडल्या कशा धडाडा
क्षणार्धांत संपले सारे
तरी का घेत नसेधडा

आठ मुठ नेते मंडळी
सांगती यंत्रणेला नडा
भ्रामक साध्याकरिता
स्वताचे प्राणाशी लढा

भितीच्यासावटाखाली
भयग्रस्त दिवस काढा
सारे चांगले चाले तरी
मध्यात घालती खोडा

**- हेमंत मुसरीफ पुणे**
**९७३०३०६९९६.**

अक्षराज
अचूक वेध, अचूक बातमी

# महसूल विभागाचा अजब कारभार चव्हाट्यावर ; शेतकऱ्यांचा निवेदनाद्वारे अमरण उपोषणाचा ईशारा

**अक्षराज : विश्वास वराळे**

**दि.३१, धाराशिव :** महाराष्ट्रातच काय देशात कुठेच नसलेला कूळ कायदा वारसाचा फेर आणी इतर सर्व महसूली कामे कळंब येथे बसून केले जात असल्याचा आरोप इटकूर येथील शेतकरी ज्ञानदेव साहेबराव गंभीरे व केशव बाबूराव गीरे यांनी धाराशिव जिल्हाधिकारी साहेब यांना दिलेल्या निवेदनात केले आहेत.

सविस्तर माहिती अशी की वरील शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी साहेबांना निवेदनाद्वारे इटकूर येथे कार्यरत असलेले मंडळ अधिकारी प्रणिता दराडे यांनी बेकायदेशीररित्या आधीकार नसताना गट नंबर ५४ मधे बोगस कुळाचे प्रमाणपत्र देऊन सदरील गटातील जमीनीचा खरेदी विक्रीचा गैरव्यवहार झाला असून रजीष्ट्री झाली आहे आणी यासाठी सर्वस्वी जबाबदार संबंधीत




मंडळ अधिकारी आहेत. तसेच ज्ञानदेव साहेबराव गंभीरे यांच्या शेतजमिनीत ही मयताच्या फेरफारमध्ये संबंधीत खऱ्या वारसांना आनाभीज्ञ ठेऊन इतर संबंध नसलेल्या व्यक्तींचा फेरफार केला असल्याची तक्रार केली आहे. तसेच मांजरा नदीपात्रातून होणारा वाळू उपसा शासकीय गायरान जमीनीतून गौनखणीजाचे गैर कायदेशीर उत्खनन व विक्री याच बरोबर संबंधीत अधिकारी कर्मचारी कार्यालयीन कामकाज हे कळंब शहरातूनच करतात कार्यालयात हजर नसतात व प्रत्येक कामकाजात गैरव्यवहार होतोच लाच घेतल्याशिवाय कोणतेच काम होत नाही. शिवाय गैर कायदेशिर कामे विना अडथळा जोमाने चालू असल्याचा आरोप निवेदनातून केला आहे.धाराशिव जिल्ह्याला लाभलेले तरुण तडफदार जिल्हाधिकारी कारण पूजार साहेब यांणी या कडे लक्ष देऊन महसूल विभाग सुरळीत करण्याची मागणी होत आहे

सरकार नवनविन योजना राबवत असून शेतकऱ्यांना महसूली कामात त्रास होऊ नये विना अडथळा लवकरात लवकर कामे व्हावेत. यासाठी ऑनलाईन सुविधा व वरीष्ठांणा विषेश आधीकार प्रदान केले आहेत या आधीकाराचा वापर करून भ्रष्ट कर्मचाऱ्यावर कठोर कारवाई होईल का याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागलेले आहे.

# राज्यात पावसाचा धुमाकूळ; यवतमाळ जिल्ह्यातील नऊ, तर बुलढाण्यातील तीन तालुक्यांत अतिवृष्टी

**दि.३१, नागपूर :** मान्सून बुधवारी विदर्भात दाखल झाला. पश्चिम विदर्भातील बुलढाणा, अकोला, यवतमाळ आणि अमरावती जिल्ह्यात दमदार पावसामुळे पूरपरिस्थिती निर्माण झाली आहे. वादळामुळे झाडे आणि विजेचे खांब कोसळल्याने अनेक गावे रात्रभर अंधारात होती. या पावसामुळे यवतमाळमधील नऊ आणि बुलढाण्यातील तीन तालुक्यांमध्ये अतिवृष्टीची नोंद झाली आहे. अकोल्यात मे महिन्यात आजवरचा सर्वाधिक पाऊस झाला आहे.

### लिंगमळा धबधबा प्रवाहित

सातारा : महाबळेश्वर येथील प्रसिद्ध लिंगमळा धबधबा प्रवाहित झाला आहे. फेसाळत वाहत असलेल्या धबधब्याचे नयनरम्य दृश्य ऐन मे महिन्यातच पाहायला मिळत असल्याने पर्यटक याचा मनमुराद आनंद लुटताना दिसत आहेत. महाराष्ट्राची पर्यटन पंढरी असलेल्या महाबळेश्वर येथे पावसाची कोसळधार सुरू आहे, मे महिन्यात येथे पावसाची विक्रमी नोंद झाली आहे. 'कोयना'मध्ये १९ टीएमसी

गेल्या आठ-दहा दिवसांपासून धुवांधार कोसळणाऱ्या पावसाचा जोर थोडा कमी झाला. गेल्या चोवीस तासांत जिल्ह्यात १६.२ मिलिमीटर पाऊस झाला आहे. मे महिन्यातील सलग आठ दिवसांच्या पावसामुळे धरणातही पाण्याची आवक झाली आहे. कोयना धरणात सध्या उपयुक्त पाणीसाठा १९.१९ टीएमसी आहे; तर गेल्या वर्षीच्या २७ मे रोजी १६.३४ इतका साठा होता. गेल्या वर्षी आटलेले आंधळी धरण मे महिन्यातच पूर्ण क्षमतेने भरले आहे.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### दिव्यात नालेसफाईचा बोजवारा; कल्याण जिल्हाध्यक्षांचा पाहणी दौरा



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३०, दिवा (ठाणे) :** दिवा शहरात २ तासात झालेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी चाळीत पाणीच पाणी झाले होते. तर अनेकांच्या दुकानात गटाराचे पाणी गेले होते. फक्त २ तासाच्या मुसळधार पावसामुळे ही परिस्थिती ओढवली तर दिवा आगासन हा मुख्य रस्ता देखील सिद्धिविनायक गेट जवळ जलमय झाला होता परिणामी स्थानिक नागरिकांनी दिवा मंडळ अध्यक्ष सचिन भोईर यांना सदरची माहिती दिली असता सचिन भोईर यांनी कल्याण जिल्हा अध्यक्ष नंदू परब यांच्या समवेत आज दिवा शहराची नालेसफाईची पाहणी केली. याप्रसंगी संपूर्ण दिवा भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. दिव्यातील बि आर नगर तसेच मुख्य दिवा आगासन रोड परिसराची पाहणी दरम्यान अनेक त्रुटी आढळून आल्याचे स्पष्ट झाल्याचे निदर्शनास आले. योग्य वेळी नालेसफाई झाली असती तर आज लोकांवर हि वेळ आली नसती संबंधित प्रशासकिय अधिकायांना फोन करून दोन दिवसाच्या आत पाहणी दौरा करून योग्य ती उपाय योजना करावी असे भाजप कल्याण जिल्हाध्यक्ष नंदू परब यांनी स्पष्ट पणे अधिकायांना सांगितले.

ठाणे जिल्हा कार्यकरणी सदस्य विजय भोईर आणि भाजप दिवा मंडळ यांच्या वतीने नवनिर्वाचित कल्याण जिल्हा अध्यक्ष श्री नंदूदादा परब यांची कल्याण जिल्हाध्यक्ष पदावर नियुक्ती झाल्याबद्दल जाहीर सत्कार करण्यात आला. मागील लोकसभा व विधानसभा निवडणुकीत कल्याण ग्रामीण निवडणूक प्रमुख असे महत्त्वाचे पद नंदू परब यांच्याकडे होते. एक तळागाळातला कार्यकर्ता आपल्या कामाच्या चिकाटीने आज जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती झाली हीच त्यांच्या कामाची पोचपावती आहे. यावेळी मंडळ अध्यक्ष सचिन भोईर, दिवा मंडळ सरचिटणीस समीर चव्हाण, चेतन पाटील, कार्यकारी सदस्य जिलाजीत तिवारी, सम शेर यादव, उपाध्यक्ष नितीन कोरगावकर, गणेश गुप्ता, गौरव पाटील, क्रांती सिंह, आकाश सावंत, अनिल पवार, सिद्धेश परब आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

### रिक्षा चालकाचा, भाजी विक्रेतेचा मुलगा झाला एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३०, घणसोली (नवी मुंबई) :** विद्यार्थ्यांमध्ये अभ्यास करण्याची जिद्द आणि चिकाटी असल्यावर आपल्या कोणत्याही परिस्थिती वरती मात करून तो यशाचे शिखर गाठल्याशिवाय राहत नाही. हे वास्तव नाकारता येत नाही. नवी मुंबई घणसोली गावातील समर्थ नगर येथील एका रिक्षा चालकाच्या मुलांनी आपल्या गुणवत्तेच्या जोरावर महाराष्ट्र शासनाच्या वतीने घेतल्या जाणाऱ्या एमपीएससी परीक्षेमध्ये उत्तीर्ण होण्याचा मान पटकावला आहे. ठाणे कलेक्टर कार्यालय येथे महसूल सहाय्यक अन्न पुरवठा विभाग पदी निवड झाली आहे. विद्यार्थ्याचे नाव समीर चिकणे असे असून त्याचे वडील बाळू चिकणे हे रिक्षा चालक म्हणून काम करत आहेत व आई रस्त्यावरती भाजी विक्रीचा व्यवसाय करीत आहे.

दरम्यान आपल्या मुलांनी शिक्षण घेऊन मोठे झाले पाहिजे. असे स्वप्न या दोघाही दांपत्यांनी पाहिले होते. त्यानुसार समीर चिकणे याला पुणे येथील विद्यानिकेतन करिअर अकॅडमीत शिक्षणासाठी दाखल केले होते. घरची परिस्थिती अत्यंत बेताची असताना सुद्धा समीरच्या आई-वडिलांनी त्याच्या शिक्षणासाठी काहीच कमी पडू न दिल्यामुळे समीर यांनी आई-वडिलांच्या मेहनतीचे चीज करून एमपीएससी पास होण्याचा पल्ला गाठलेला आहे. त्यामुळे समीर चिकणे यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. ठाणे जिल्हा ऑटो रिक्षा टॅक्सी चालक-मालक संघटनेतर्फे त्याचा सत्कार करण्यात आला. संघटनेचे उपाध्यक्ष राजेश पाटील यांनी समीर चिकणे यांना शाल आणि फुलगुच्छ श्रीफल देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

समीर चे वडील हे रिक्षा चालक असून आई ही रस्त्यावरती भाजीपाल्याचा व्यवसाय करीत आहे आपल्या मुलांनी चांगल्या प्रकारे शिकले पाहिजे यासाठी ते धडपडत होते समीर एमपीएससी परीक्षेत उत्तीर्ण झाल्याने त्यांच्या मनामध्ये उत्सवाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. असाच धडा इतर विद्यार्थ्यांनी देखील घेऊन आपले स्वप्न पूर्ण केले पाहिजेत असे मत देखील व्यक्त केले जात आहे.

### नुकसानीचे पंचनामे तात्काळ पुर्ण झाल्यावर शासनाकडून निश्चीतपणे मदत - मंत्री मकरंद पाटील

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, सातारा :** सातारा जिल्ह्यात इतर तालुक्यांच्या तुलनेत फलटण, माण, खटाव या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी होऊन नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे तात्काळ पूर्ण करुन भरपाईसाठी त्वरीत सादर करावेत, एकत्रितपणे पंचनामे राज्यशासनाला प्राप्त झाल्यावर शासन निकषानुसार निश्चितपणे मदत करेल अशी ग्वाही मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद पाटील यांनी दिली.

फलटण तालुक्यातील फलटण शहरासह बाधित गावांची भेट देऊन अवकाळी पावसाने झालेल्या नुकसानीची पाहणी मदत व पुनर्वसन मंत्री श्री. पाटील यांनी केली. यावेळी फलटणचे आमदार सचिन पाटील, प्रांताधिकारी प्रियांका आंबेकर, पोलीस उपविभागीय अधिकारी राहुल धस, तहसीलदार डॉ.अभिजीत जाधव, मुख्याधिकारी निखिल मोरे, प्रभारी गट विकास अधिकारी श्री. कुंभार आदी उपस्थित होते. गेल्या अनेक वर्षात महाराष्ट्रात मान्सून पूर्वी असा पाऊस कधी झाला नसून असा प्रथमच मोठ्या प्रमाणात पाऊस पडल्याचे पाहणी प्रसंगी सांगून मंत्री श्री. पाटील म्हणाले, आतापर्यंत झालेल्या पंचनाम्यानुसार अतिवृष्टीने घरांची पूर्णतः पडझड झाली आहे. शेतपीकांचे नुकसानही मोठ्या प्रमाणात झाले असून बागायती व फळपिकांखालील क्षेत्र बाधित झाले आहे. अंगणवाडी, शाळांसह सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी जनावरेही मयत झाली आहेत. अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीच्या पंचनाम्याचे काम ८० टक्के पूर्ण झाले असून राहिलेले पंचनामे पूर्ण करण्याचे युध्दपातळीवर काम सुरु आहे. भरपाईसाठीचे प्रस्ताव सादर करण्यासाठीच्या सूचना मदत व पुनर्वसन विभागाकडून दिल्या आहेत. यंत्रणांनी पंचनामे त्वरीत पूर्ण करावेत. रस्ते, पूल, बंधाऱ्याचे नुकसान झाले आहे. काही ठिकाणी नदीचे पात्र बदलले आहे. त्यांच्या दुरुस्तीचेही प्रस्ताव संबंधित यंत्रणांनी तात्काळ सादर करावेत अशा सुचना दिल्या. अतिवृष्टीने ज्या घरात पाणी शिरले आहे, त्या घरातील नागरिकांना स्थलांतर करून त्यांच्या जेवणाची, रेशनची व्यवस्था स्थानिक प्रशासनाकडून व सेवाभावी संस्थाकडून करण्यात आली आहे, अशी माहिती ही मकरंद पाटील यांनी दिली.

## पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती



**भारतीय इतिहासात मोठी युद्धे झाली, साम्राज्ये उभी राहिली आणि कोसळली. परंतु, या साऱ्या घडामोडींमध्ये ज्या व्यक्तींनी आपल्या कार्याने समाजहित, धर्मरक्षण आणि जनकल्याण या मूल्यांना सर्वोच्च मान दिला, त्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्थान अग्रभागी आहे. त्यांच्या जीवनकार्याने सिद्ध केलं की एका स्त्रीचं नेतृत्व केवळ राजसिंहासनापुरतं मर्यादित राहत नाही, तर ते समाजाच्या सर्व स्तरांपर्यंत पोहोचू शकतं. अहिल्यादेवी होळकर या केवळ इंदूरच्या होळकर घराण्याच्या राणी नव्हत्या तर त्या एक द्रष्ट्या प्रशासक, न्यायप्रिय नेत्या, धर्मपरायण समाजसुधारक आणि स्त्री सक्षमीकरणाच्या आद्य पुरस्कर्त्या होत्या. त्यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त, त्यांचे स्मरण त्यांच्या विचारांमधून नव्याने प्रेरणा घेण्याचे निमित्त आहे!**

प्रशासन आणि सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे नेतृत्व केवळ राज्यकारभारापुरते मर्यादित नव्हते, तर त्यात धर्म, न्याय, लोकसेवा आणि नीतीमूल्यांचे सखोल अधिष्ठान होते. त्यांनी महेश्वरला आपली राजधानी बनवली. ही राजधानी एक आदर्श प्रशासनाचे प्रमाण होते. येथे अहिल्यादेवींनी एक पारदर्शक, न्यायपूर्ण आणि लोकाभिमुख राज्यकारभार चालवला. तेव्हाच्या काळात एक राणी प्रत्यक्षपणे जनतेच्या तक्रारी ऐकून त्यावर तत्काळ निर्णय घेते, अशी कल्पनाही करवत नाही. पण अहिल्यादेवी दररोज प्रजेसोबत संवाद साधत, त्यांच्या अडचणी समजून घेत आणि न्याय देत. हे त्यांचे कार्य आजच्या लोकशाही व्यवस्थेलाही मार्गदर्शक ठरावे असेच आहे. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य धार्मिक स्थळांचे पुनरुज्जीवन आणि समाजकल्याण यासाठी वाहिले. काशी विश्वनाथ, गंगाघाट, रामेश्वरम, सोमनाथ, द्वारका अशा अनेक प्राचीन आणि पवित्र स्थळांचे जीर्णोद्धार करून त्यांनी भारतीय सांस्कृतिक एकात्मतेचे धागे पुन्हा मजबूत केले. याशिवाय देशभर त्यांनी शेकडो धर्मशाळा, घाट, कुंड, विहिरी, अन्नछत्रे आणि विश्रामगृहे उभारली. हे कार्य कोणत्याही जाती-धर्माचा भेद न करता सर्वसामान्य जनतेसाठी केले गेले. त्यांच्या या पुढाकारामुळे हजारो लोकांना निवारा, अन्न आणि आधार मिळाला. त्यांचे हे सामाजिक कार्य आजही संपूर्ण भारतात लोककल्याणकारी राज्यशासनाचा आदर्श नमुना मानले जाते. प्रशासन आणि समाजकारण यांचा असा सुरेख मिलाफ क्वचितच इतिहासात पाहायला मिळतो आणि त्याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणजे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर!

**स्त्री सक्षमीकरणाचे आदर्श !**

अठराव्या शतकातील भारतात स्त्रियांना घराच्या चार भिंतींपलीकडे जाण्याची मुभा नव्हती. पण अशा काळातही अहिल्यादेवी होळकर यांनी स्त्रिया आत्मनिर्भर बनाव्या यासाठी पुढाकार घेतला. त्या काळात त्यांनी सुरू केलेला महेश्वरी साडी उद्योग केवळ व्यवसाय नव्हता तर तो एक सामाजिक क्रांतीचा भाग होता. महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी त्यांनी काशी आणि इतर ठिकाणांहून कुशल विणकरांना महेश्वरला बोलावले. त्यांनी स्थानिक महिलांना हातमाग प्रशिक्षण दिले, आणि महिलांना घरोघरी बसून उत्पन्न मिळवण्याची संधी निर्माण केली. या उद्योगाने हजारो महिलांना केवळ रोजगारच दिला नाही, तर स्वाभिमान, ओळख आणि आत्मसन्मानही दिला. आजही महेश्वर व आसपासच्या भागात महेश्वरी साड्या विणणाऱ्या हजारो महिला पहायला मिळतात. या साड्या केवळ पारंपरिक पोशाख नाहीत, तर त्या अहिल्यादेवींच्या द्रष्ट्या धोरणांचा आणि स्त्रीसन्मानाच्या तत्त्वांचा वस्त्ररूप अविष्कार आहेत. त्यांनी कोणत्याही जाती, धर्म, वर्ग यांचा भेद न करता सर्वांसाठी कार्य केले. १३ ऑगस्ट १७९५ रोजी या महान राणीने देहत्याग केला. धर्मशाळा, भजनमंडळे, सार्वजनिक पाणवठे आणि शिक्षणाच्या सुविधा त्यांनी महिलांसाठी खुल्या केल्या. त्या काळात जेव्हा स्त्रियांना समाजात दुय्यम स्थान होते, तेव्हा त्यांनी महिलांना धार्मिक, सामाजिक आणि आर्थिक निर्णयांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याची मुभा दिली. अहिल्यादेवींच्या या कार्यामुळेच त्यांना 'पुण्यश्लोक,' 'लोकमाता' आणि 'राजमाता' अशा सन्मानार्थ उपाधी प्राप्त झाल्या. केंद्र शासनाने त्यांच्या स्मृतींना वंदन म्हणून टपाल तिकीट प्रकाशित करून त्यांच्या कार्याला उजाळा दिला आहे. इ.स. १७६७ साली त्यांनी महेश्वर येथे हातमाग उद्योग सुरू करून एक स्थायिक, गुणवत्ताधिष्ठित आणि बाजारपेठेचा विचार करणारा स्थानिक उद्योग उभारला. यामागील हेतू होता तो स्त्रियांना उपजीविकेचा मार्ग उपलब्ध करून देणे आणि महेश्वरला धार्मिक व पारंपरिक वस्त्रकलेचे केंद्र बनवणे. महेश्वरी साडी आणि अहिल्यादेवी यांचे नाते केवळ वस्त्रनिर्मितीपुरते मर्यादित नाही, तर ते महिला सक्षमीकरण, सांस्कृतिक वारसा आणि स्थानिक उद्योगाचा उत्कर्ष यांचे प्रेरणादायी उदाहरण आहे.

**महेश्वरी साड्यांची क्रेझ आजही कायम !**

महेश्वरी साड्या हलक्या आणि देखण्या

सूती किंवा सिल्क-कॉटन मिश्र धाग्यांपासून तयार होतात, त्यामुळे साडी नेसण्यास हलकी

साड्यांची किनारी (पट्टा) (झरी पट्टा) अतिशय आकर्षक आणि पारंपरिक नक्षीकामाने सजलेली

रिव्हर्सिबल बॉर्डर म्हणजेच दोन्ही बाजूंनी वापरता येणारी साडी ही वैशिष्ट्यपूर्ण गोष्ट

भारतातच नाही तर विदेशात ही प्रसिद्ध

हस्तकला आणि महिला उपयोजनता याचे प्रतीक

पारंपारिक पण मोहक रंगसंगती गडद जांभळा, हिरवा, पिवळा, राखाडी यांसारखे रंग

अहिल्यादेवींनी त्याकाळी फक्त उद्योग उभारला नाही, तर महिलांना कामात समाविष्ट करून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र बनवले. आजही महेश्वर येथील अनेक महिलांचे कुटुंब महेश्वरी साड्या विणण्यावर आधारित आहे. महेश्वरी साडी म्हणजे केवळ एक पारंपरिक वस्त्र नाही, तर ती आहे अहिल्यादेवींच्या दूरदृष्टीची, सामाजिक जाणिवेची आणि स्त्री सन्मानाच्या विचारांची एक जिवंत आठवण म्हणता येईल.

**'स्टार्टअप' महिला उद्योजिकांसाठी प्रेरणास्रोत!**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची त्रिशतकी जन्मजयंती साजरी करताना त्यांच्या दूरदृष्टीने घडवलेल्या उपक्रमांचा आजच्या काळातही प्रभाव दिसतो. महेश्वरी साडी उद्योग हे त्याचे अत्यंत प्रेरणादायी उदाहरण आहे. त्यांनी स्थापलेला हा स्थानिक उद्योग आजही महिला सक्षमीकरणाचा आदर्श मॉडेल मानला जातो. त्यांच्या विचारांतून निर्माण झालेल्या या व्यवसायाचे स्वरूप केवळ आर्थिक नव्हते, तर ते सामाजिक समावेश, कौशल्यविकास आणि स्वावलंबनाच्या मूल्यांवर आधारित होते. आज अनेक स्वयंसेवी संस्था आणि शासनाच्या योजनांद्वारे महेश्वरी साडी उद्योगातून ग्रामीण महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला जात आहे. अहिल्यादेवींच्या कार्यातून मिळणारा मूलभूत धडा म्हणजे – कोणताही व्यवसाय फक्त नफा मिळवण्यासाठी नसावा, तर तो समाजातील दुर्बल घटकांना सक्षम करण्याचे साधन असावे. त्यांची ही दूरदृष्टी आजच्या स्टार्टअप महिला उद्योजिकांसाठी मार्गदर्शक ठरते.

महिला उद्योजिकांनी सामाजिक संवेदना, स्थानिक कौशल्यांचा विकास आणि सांस्कृतिक मूल्यांचा समावेश करताना, व्यवसाय कसा दीर्घकालीन आणि समर्पित बनवावा याचे उत्तम उदाहरण म्हणजे अहिल्यादेवींचा साडी उद्योग. आज महेश्वरी साडी जगभरात प्रसिद्ध आहे, पण तिच्या प्रत्येक धाग्यामागे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांचे स्वप्न, दूरदृष्टी आणि स्त्रीच्या सन्मानासाठी दिलेले योगदान विणलेले आहे.

या ऐतिहासिक वारशाला आदरांजली वाहत, राज्य शासनाने ६ मे २०२५ रोजी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या जन्मस्थळी चौंडी (जि. अहिल्यानगर) येथे विशेष मंत्रिमंडळ बैठकीत महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी आदिशक्ती अभियान राबविण्याचा निर्णय घेतला. या अभियानाचा उद्देश म्हणजे महिलांना आरोग्य, पोषण, शिक्षण, आर्थिक सबलीकरण, सामाजिक सहभाग आणि नेतृत्व विकासाच्या माध्यमातून सशक्त करणे आहे. तसेच बालमृत्यू व मातामृत्यू कमी करणे, महिलांचा पंचायतराजमध्ये सहभाग वाढवणे, बालविवाह व कौटुंबिक हिंसाचारास प्रतिबंध करणे, अशा अनेक महत्त्वपूर्ण बाबी यामध्ये समाविष्ट आहेत. ग्रामपातळीपासून राज्यस्तरापर्यंत विशेष समित्या स्थापन करून त्यांचे वार्षिक मूल्यमापन केले जाईल. उल्लेखनीय कार्य करणाऱ्या समित्यांना आदिशक्ती पुरस्कार देण्यात येणार असून, हे पुरस्कार दरवर्षी मार्च महिन्याच्या पहिल्या आठवड्यात वितरित होतील. या उपक्रमासाठी दरवर्षी अंदाजे १०.५० कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे. या अभियानाचे मूळ बीज पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या विचारांमध्येच आहे. स्त्री ही केवळ कुटुंबाचा आधार नसून, ती समाजाच्या पुनर्बांधणीची शक्ती आहे. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ राबवले जाणारे 'आदिशक्ती अभियान' हे स्त्रीसन्मान, स्त्रीसशक्तीकरण आणि सामाजिक परिवर्तनाचे आधुनिक रूप आहे.

## मनपाच्या वतीने घेण्यात आलेल्या अभिनय प्रशिक्षण शिबिराचा समारोप




**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३१, पनवेल :** नृत्य, गायन, अभिनय अशा विविध कलेपैकी कोणतीही कला जर जोपासली तर तुम्ही नक्की किर्तीवंत व्हाल, कलेमुळे यश मिळावयचे असेल तर त्या दृष्टीने प्रशिक्षण घेणे महत्वाचे आहे. असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आज केले. पनवेल महानगरपालिका व अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आठ दिवसांचे अभिनय प्रशिक्षण शिबीर आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात घेण्यात आले होते. या शिबिराच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. या आयोजनाबद्दल महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी नाट्य परिषदेचे अभिनंदन केले. तसेच सर्व रंगकर्मी यांना, प्रशिक्षणार्थींना पुढील कारकीर्दीसाठी शुभेच्छा देऊन कलाक्षेत्र जोपासण्यासाठी ठाकूर परिवार पनवेलकरांच्या सदैव सोबत राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली. यावेळी अखिल भारतीय नाट्य परिषद, शाखा पनवेल अध्यक्ष तथा आमदार प्रशांत ठाकूर, बाल रंगभूमी परिषद उपाध्यक्ष तथा नाट्य परिषदेच्या कार्यकारणी सदस्य प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर, अखिल भारतीय नाट्य परिषद, शाखा पनवेलचे उपाध्यक्ष तथा माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अभिनेते प्रकाश राणे, उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, उपायुक्त मंगला माळवे, महापालिका सचिव अक्षय कदम, प्रशिक्षक अशोक केंद्रे, (मुंबई) रवी धुताडमल,(बीड) मनोज चिताडे (वर्धा) आदी मान्यवर उपस्थित होते.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी मार्गदर्शन करताना पनवेल कार्यक्षेत्रात उत्तमोत्तम कलाकार बनावेत अशा शुभेच्छा देऊन यासाठी महापालिकेने व पनवेल नाट्य परिषद शाखेने अभिनय शिबीर घेतल्याबद्दल खास आभिनंदन केले. भविष्यात नक्कीच या अभिनय शिबीराचा सर्व प्रशिक्षणार्थीना प्रत्यक्ष अप्रत्यक्ष भरपूर फायदा होईल. या निमित्ताने महापालिका सांस्कृतिक चळवळ उभी करून नवीन पायंडा पाडत असल्याचेही त्यांनी सांगितले. उपाध्यक्ष बाल रंगभूमी परिषद तथा अखिल भारतीय नाट्य परिषद कार्यकारणी सदस्य प्राचार्य डॉ. दीपाताई क्षीरसागर यांनी सांगितले, आज काल ताणताणवाचे जीवन सर्वजण जगत आहे. शरीराचा ताण कमी करण्यासाठी व्यायाम केला जातो, पण मनावरचा ताण कमी करण्यासाठी कलाच उपयोगी पडते. यासाठी मुलांना गायन, नृत्य, अभिनय अशा विविध कलेचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. पनवेल मनपा व नाट्य परिषद असे उपक्रम घेत असल्याबद्दल त्यांनी विशेष कौतुक केले.

## खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या मुख्य अभियंता पदी गिरीश कुमरवार रुजू




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३१, नागपूर :** खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे अतिरिक्त मुख्य अभियंता विलास मोटघरे यांच्या जागी गिरीश कुमरवार यांची खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या मुख्य अभियंता पदी निवड करण्यात आली. मुख्य अभियंता गिरीश कुमरवार यांनी खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राचा पदभार सांभाळल्यानंतर खापरखेडा कॉन्ट्रॅक्टर्स असोसिएशनतर्फे संघटनेचे अध्यक्ष दिलीप बनसोड यांच्या हस्ते कुमरवार यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. यावेळी कामगार कल्याण अधिकारी आनंद वाघमारे प्रामुख्याने उपस्थित होते.

याप्रसंगी कॉन्ट्रॅक्टर असोसिएशनचे महासचिव दिवाकर घेर, शांताराम गावंडे, मोहन जैन, शामराव सरोदे,अनिल भोयर, कुणाल भोस्कर, रमेश लोणारे, भरत पटेल,अहफाझ अहमद, देवाजी कुबडे, विनोद बरडे, दिलीप ढगे, गणेश लोणारे, राजेश खंडारे, रामचंद्र जोगे, चंद्रकांत तुपकर, पप्पू परीपगार, नरेश पानतावणे, शरद पाटील, ज्ञानेश्वर भगत, शमशाद अन्सारी, उत्तम गेडाम, राजेश गायकवाड, चंद्रशेखर पानतावणे, संतोष पाटील, विकास झिंगरे, पुरुषोत्तम चहाकर, केशव पानतावने, सुरज भारद्वाज, राजीक पठाण, अशोक वासनिक, दिनेश काकडे आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.

अक्षराज

४ | बुलडाणा, रविवार, दि.०१ जून २०२५ | संमिश्र

# टायगर सफारीने चंद्रपूरच्या पर्यटनाला नवी दिशा मिळणार - आ.जोरगेवार

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, चंद्रपूर :** चंद्रपूर येथे १७१ हेक्टर जागेत टायगर सफारीसाठी २८६ कोटी रुपयांच्या प्रस्तावाला मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्र वन विकास महामंडळाच्या अधिनस्त एफडीसीएम गोरेवाडा झू लिमिटेडकडे आराखडा तयार करण्याचे काम सोपविण्यात आले असून आमदार किशोर जोरगेवार यांनी नागपूर येथील वन विभागाच्या विश्रामगृहात एफडीसीएम गोरेवाडा झू लिमिटेडच्या अधिकाऱ्यांसह बैठक घेऊन कामाचा आढावा घेतला आहे.



या बैठकीला एफडीसीएम गोरेवाडा झू लिमिटेडचे प्रभारी मुख्य कार्यकारी अधिकारी शतनीक भागवत यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांची उपस्थिती होती. चंद्रपुरमध्ये टायगर सफारी सुरु व्हावी, यासाठी आ. किशोर जोरगेवार यांनी विशेष प्रयत्न केले आहेत. अनेक अधिवेशनामध्ये आ. जोरगेवार यांनी सदर मागणीवर लक्ष वेधले होते. परिणामी, या प्रकल्पाला मंजुरी मिळाली आहे. यासाठी २८६ कोटी रुपयांचा प्रस्ताव तयार करण्यात आली असून महाराष्ट्र वन विकास महामंडळाने सदर कामाचा आराखडा तयार करण्याचे काम गोरेवाडा झू लिमिटेड कडे दिले आहे. त्यांनी उत्कृष्ट आराखडा तयार केला आहे. सदर बैठकीत या आराखड्याबाबत सविस्तर माहिती देण्यात आली आहे. चंद्रपूरच्या टायगर सफारीत प्रत्येकी पाच हेक्टरमध्ये तीन झोन तयार करण्यात येणार असून, यात 'ऑस्ट्रेलियन ट्रेल', 'साऊथ अमेरिकन ट्रेल' आणि 'इंडियन ट्रेल' असणार आहेत.

पर्यटकांना पायवाटांवरुन चालत प्राण्यांना पाहण्याचा अनुभव घेता येणार आहे. तर ४४ हेक्टरमध्ये पर्यटकांना वाहनातून सफारीचा अनुभव घेता येईल. २० एकरमध्ये चिल्ड्रन पार्क आणि पर्यटकांसाठी विविध सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. हे एक भव्य पर्यटन क्षेत्र ठरेल आणि चंद्रपूरच्या पर्यटनात मोठी वाढ होईल, असा विश्वास आ. किशोर जोरगेवार यांनी व्यक्त केला आहे. या टायगर सफारी प्रकल्पामुळे रोजगाराच्या संधीही मोठ्या प्रमाणात निर्माण होणार आहेत. स्थानिक युवकांना मार्गदर्शक, संरक्षण कर्मचारी, सफारी वाहनचालक, प्राणी संग्रहालय अशा विविध भूमिका मिळतील. शिवाय स्थानिक व्यवसायांना हॉटेल, होम-स्टे, स्मृतीचिन्ह, खाद्यपदार्थ विक्री व्यवसायाला देखील चालना मिळेल. यामुळे चंद्रपूरच्या अर्थव्यवस्थेला आणि विकासाला गती मिळेल, असे आ. जोरगेवार यांनी सांगितले.

**विदेशी प्राणी ठरणार आकर्षण**

ऑस्ट्रेलियन ट्रेलमध्ये कांगारु, कॅसोवरी, वाला, लाफिंग कुकाबुरा आणि विविध रंगीबेरंगी पक्षी पर्यटकांना पाहता येणार आहेत. साऊथ अमेरिकन ट्रेलमध्ये जग्वार, कॅपुचिन माकड, स्पायडर माकड, कॅपीबारा, निळे व लाल मकाव असे विदेशी प्राणी पर्यटकांचे विशेष आकर्षण ठरणार आहेत.

# परप्रांतीय कामगारांची पोलीस पडताळणी अनिवार्य करण्याचे निर्देश : आ.अडबाले यांच्या मागणीला यश

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, चंद्रपूर :** जिल्ह्यातील उद्योगांमध्ये मोठ्या प्रमाणावर परप्रांतीय कामगार कार्यरत आहेत. मात्र, त्यांची पोलीस पडताळणी न करता थेट कामावर घेण्यात येत असल्याने गंभीर गुन्हेगारीला चालना मिळत असल्याचा धोका निर्माण झाला आहे.

याच पार्श्वभूमीवर नागपूर विभाग शिक्षक मतदार संघाचे आ. सुधाकर अडबाले यांनी ही गंभीर बाब गृहमंत्र्यांना निदर्शनास आणून दिली होती. या मागणीची दखल घेत गृह विभागाच्या उपसचिवांनी महाराष्ट्र पोलीस महासंचालक आणि चंद्रपूर जिल्ह्याचे पेलीस अधीक्षक यांना परप्रांतीय कामगारांची पोलीस व्हेरीफीकेशन करण्याचे निर्देश देऊन आवश्यक ती पावले उचलण्याचे निर्देश दिले आहेत.



औद्योगिक दृष्टीकोनातून चंद्रपूर हा महत्वाचा जिल्हा असून येथे बाहेरुन येणाऱ्या मजुरांची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. या वर्षाच्या सुरुवातीला अमृतसर येथील पोलीस चौकीवर हल्ला करणाऱ्या खलिस्थानी दहशतवाद्याला चंद्रपूर येथून अटक करण्यात आली होती. या घटनेनंतर परप्रांतीय कामगारांच्या पार्श्वभूमीची शहानिशा करणे किती आवश्यक असल्याचे आमदार सुधाकर अडबाले यांनी मुख्यमंत्री तथा गृहमंत्र्यांना निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले होते. आ. अडबाले यांच्या मागणीची दखल घेत औद्योगिक क्षेत्रात कायदा व सुव्यवस्था सुरळीत ठेवण्यासाठी तसेच गुन्हेगारीला आळा घालण्याकरीता औद्योगिक क्षेत्रात परप्रांतीय कामगारांची नियुक्ती करतांना पोलीस पडताळणी अनिवार्य करण्यात यावी व याबाबत सर्व पोलीस घटकांना सुचित करण्यात यावे, असे निर्देश महाराष्ट्र पोलीस महासंचालक व आणि चंद्रपूर जिल्हा पोलीस अधीक्षक यांना गृह विभागाचे उपसचिव चेतन निकम यांनी दिले आहे.

आता जिल्ह्यातील सर्व उद्योगांनी परप्रांतीय कामगारांची पोलीस पडताळणी करणे बंधनकारक असेल. त्यांच्या ओळखीची सर्व कागदपत्रे तपासल्यानंतरच त्यांना कामावर घेता येणार आहे. कंपन्यांनी अशा कामगारांची माहिती स्थानिक पोलीस विभागास सादर करणे अनिवार्य राहील. या निर्णयामुळे औद्योगिक क्षेत्रात कायदा सुव्यवस्था टिकवून ठेवणे सुलभ होणार असून गुन्हेगारी प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवता येणार आहे.

# वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षाच्या पार्श्वभूमीवर आ. मुनगंटीवार यांनी घेतली महत्वपूर्ण बैठक

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, चंद्रपूर :** जिल्ह्यात वाघांच्या वाढत्या हल्लयांमुळे गावकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. गेल्या दीड महिन्यात ९ जणांना आपला जीव गमवावा लागला आहे. त्यामुळे लोकांमध्ये असंतोष पसरत चालला आहे. या वाढत्या हल्लयांमुळे नाहक जीवितहानी होत असल्याने ही बैठक आयोजित करण्यात आली. ग्रामस्थ तसेच जनावरांच्या जीवित नुकसानीची गंभीरता लक्षात घेऊन, वनविभागाने वाघांच्या होणाऱ्या हल्लयांवर नियंत्रण मिळवण्यासाठी आवश्यक कार्यवाही करावी, असे निर्देश राज्याचे माजी वने, सांस्कृतिक कार्य व मत्स्यव्यवसाय मंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी बैठकीत दिले. मूल तालुक्यातील वाघांच्या हल्लयांत ठार झालेल्या नागरिकांसंदर्भात वनविभागाच्या अधिकाऱ्यांसमवेत रामबाग विश्रामगृह येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मुख्य वनसंरक्षक डॉ.जितेंद्र रामगावकर, वनसंरक्षक तथा ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक प्रभुनाथ शुक्ला, उपसंचालक (बफर) कुशाग्र पाठक, उपवनसंरक्षक श्वेता बोड्डू, मूलचे उपविभागीय अधिकारी अजय चरडे, तहसीलदार मृदुला मोरे, विभागीय वनअधिकारी (प्रोटेक्शन) निकिता चौरे, सहाय्यक वनसंरक्षक (बफर) संकेत वाठोरे, आदेश शेडंगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मुकेश टांगले, वनपरिक्षेत्र अधिकारी राहुल कारेकार, प्रियंका वेलमे आदींची उपस्थिती होती.



आ. सुधीर मुनगंटीवार म्हणाले, भगवानपूर गावातील वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षाच्या पार्श्वभूमीवर तातडीने कुंपण मंजूर करून घेणे. मूल तालुक्यातील शेतकऱ्यांना जंगलामध्ये पडून असणारे बांबू कुंपणासाठी उपलब्ध करून द्यावेत. यासाठी वनविभागाने गावात जाऊन शेतकऱ्यांची नोंदणी करावी व शेतकऱ्यांना बांबूचा पुरवठा करावा. एफडीसीएमसह वनविभागाने कुंपणासाठी लागणारे अंदाजपत्रक तयार करावे. भगवानपूर रस्त्याच्या दोन्ही बाजूंना २० मीटर अंतरावरील झुडपे कापण्यात यावीत. वाघाचे होणारे हल्ले टाळण्यासाठी सरपणासाठी कोणीही जंगलात जाऊ नये. गावकऱ्यांना सरपण आवश्यक असल्यास त्यांनी वनविभागाशी संपर्क साधावा. यासाठी शेतकऱ्यांची नोंदणी करण्यात येऊन त्यांना वनविभागाकडून सरपण उपलब्ध करून देण्यात यावे.

गत दीड महिन्यात वाघाच्या हल्लयांमध्ये नऊ ग्रामस्थांचा मृत्यू झाला असून, याबाबत वनविभागाने वाघांची अचूक माहिती घ्यावी. मागील दोन वर्षांत २२ वाघांना पकडण्यात आले आहे. जिल्ह्यातील वाढत्या मानव-वन्यजीव संघर्षाचा विचार करता, अशा घटना टाळण्यासाठी आणि प्रसंगी तातडीने प्रतिसाद देण्यासाठी प्रत्येक विभागामध्ये प्राथमिक बचाव दल (पीआरटी) तैनात करण्यात आले असून, त्यात एकूण ९१७ सदस्य कार्यरत आहेत. शेतकऱ्यांसाठी ई-पिक पाहणीद्वारे जशी पिकांची माहिती संगणकीकृत प्रणालीतून गोळा केली जाते, तशीच एक सुसंगत प्रणाली वनविभागासाठीही तयार करता येईल. सोलर कुंपणाच्या बाबतीत तांत्रिक माहिती घेऊन स्वतंत्र माहितीपत्रक तयार करावे.

दुर्गापूर परिसरात बिबट्याचा वावर अधिक असल्याने दुर्गापुर, वनअकॅडमी पासून ते सिनाळा गावापर्यंत ॲडव्हान्स सोलर फेंसिंग करण्यासाठी कॅम्पाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. निधीस मंजूरी मिळालेली असली तरी अद्याप निधी प्राप्त झालेला नाही. याबाबत पाठपुरावा करावा. ख्रिश्चन समाजाला दफनभूमीसाठी प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालयाकडून वाईल्डलाईफ क्लिअरन्स घेण्याची आवश्यकता असल्याचेही आ. मुनगंटीवार म्हणाले. पिपरी दीक्षित येथील स्मशानभूमीची जागा महसूल विभागाच्या अखत्यारीतील असून त्याला लागूनच वनविभागाची जागा आहे; मात्र, वनविभागाकडून चुकीची मोजणी करण्यात आली असून चुकीचा नकाशा तयार करण्यात आला आहे. याबाबत मुल तहसीलदारांनी विशेष लक्ष देवून पाठपुरावा करावा. वनविभाग व सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी समन्वय साधून मूल बायपासचा प्रश्न महिनाभरात मार्गी लावावा.

तेंदूपत्ता हंगामात ५० ते ६० हजार लोक जंगलात जातात, मात्र ते वनविभागाच्या नियमांचे पालन करत नाहीत तसेच ठराविक समूहांमध्ये राहत नाहीत, त्यामुळे वनविभागाला जंगलावर नियंत्रण ठेवणे कठीण जाते. परिणामी, वाघांचे हल्ले वाढून मनुष्यहानी होते. अशी माहिती मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर यांनी दिली.

# अवकाळीमुळे शेतीचे मोठे नुकसान; आ.पाटील यांच्याकडून नुकसानग्रस्त भागाची पाहणी

**अक्षराज : विकास वाघ**

**दि.३१, धाराशिव :** मे महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यापासूनच जिल्ह्यात अवकाळी पावसाने हाहाकार माजवला आहे. मागील १५ दिवसांपासून सलग सुरू असलेल्या या मान्सूनपूर्व अवकाळी पावसामुळे शेती, फळबागा, जनावरे, घरे आणि इतर मालमत्तेचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. वीज पडून दोन जण दगावले असून आजवर ३६ जनावरे दगावली आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी तुळजापूर व धाराशिव तालुक्यातील बाधित शेतकऱ्यांच्या बांधावेत जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. तातडीने पंचनामे पूर्ण करून मदतीसाठी स्वयंस्पष्ट अहवाल शासनाकडे सादर करण्याचे आदेश त्यांनी प्रशासनाला दिले आहेत.

मागील १५ दिवसांपासून सुरू असलेल्या वादळी वाऱ्यासह झालेल्या मुसळधार पावसामुळे शेती आणि शेतकऱ्यांचे मोठर आर्थिक नुकसान झाले आहे. जिल्ह्यातील अनेक भागात विजा कोसळून पशुधनही दगावले आहे. अनेक ठिकाणी कांदा, पपई, द्राक्ष, कोथिंबीर आणि टरबूज यासारख्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. या संकटग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मसला (खुर्द), लासोना (धाराशिव) परिसरातील बाळूदेव कुलकर्णी, लक्ष्मीकांत कदम, नरसिंग कुंभार, विलास नाईकनवरे, सुभाष नाईकनवरे, उमेश साळुंके आदी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन शेतीच्या नुकसानीची पाहणी केली. सततच्या अवकाळी पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे.



शेतकरी बांधवांच्या वाट्याला आलेली ही परिस्थिती अत्यंत गंभीर आहे. एकही बाधित शेतकरी मदतीपासून वंचित राहता कामा नये, यासाठी आपण स्वतः शासनदरबारी पाठपुरावा करत आहोत, या शब्दात आमदार पाटील यांनी नुकसानग्रस्त शेतकरी बांधवांना दिलासा दिला. द्राक्ष बागांच्या पंचनाम्यांबाबत असलेल्या संभ्रमाचे निरसन करून, योग्य कारण नमूद करून पंचनामे करण्याचेही निर्देशही त्यांनी दिले आहेत. या आपत्तीमधून शेतकऱ्यांना त्वरित सावरण्यासाठी, मदतीचा प्रस्ताव तातडीने शासनाकडे पाठवला जाईल आणि लवकरच आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील असल्याचे आमदार पाटील यांनी यावेळी सांगितले. याप्रसंगी सर्वश्री दत्ताभाऊ कुलकर्णी, सतीश दंडनाईक, संतोष बोबडे, महादेव जाधव, आनंद कंदले, दयानंद शिंदे, दिनेश बागल, सुदर्शन जाधव, उद्धव पाटील, गुरुलिंग स्वामी, नागनाथ पवार, संजय स्वामी, ज्ञानेश्वर जंगाले, निळकंठ पाटील यांच्यासह महसूल व कृषी विभागाचे अधिकारी आणि स्थानिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात

# लोकमंगल मल्टीस्टेट सोसायटीच्या चेअरमनपदी पंडित लोमटे यांची निवड



**अक्षराज : विकास वाघ**

**दि.३०, धाराशिव :** लोकमंगल मल्टीस्टेट को-ऑपरेटीव्ह सोसायटीच्या चेअरमनपदी धाराशिवच्या पंडित (नाना) गुरुनाथ लोमटे आणि व्हाईस चेअरमनपदी बालाजी भगवान शिंदे यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्राबरोबरच इतर राज्यातही कार्यरत असलेल्या लोकमंगल मल्टीस्टेट को. ऑप. सोसायटीच्या संचालक मंडळाची निवडणूक (२०२५ ते २०३०) शुक्रवार, ३० मे २०२५ रोजी संपन्न झाली. यामध्ये ११ संचालक बिनविरोध निवडून आले आहेत. यामध्ये संचालक म्हणून रोहन देशमख, शितल शहाणे, राजेंद्र अडगळे, अजय ढोणे, जयसिंग देशमुख,पांडुरंग डोलारे, राजेंद्र पाटील, अश्विनी रेंगे, शितल बोरफळे यांची निवड करण्यात आली आहे. निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ए.आर.ओ. सदाशिव म धुकर पडदुणे यांनी काम पाहिले. याप्रसंगी आ. सुभाष देशमुख यांनी नूतन चेअरमन पंडित(नाना) लोमटे, व्हाईस चेअरमन व समस्त संचालकांचे अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या.

# शेतकऱ्यांनी बियाणे, खते व किटकनाशके खरेदी करताना काळजी घ्यावी

## जिल्हाधिकारी डॉ.किरण पाटील यांचे आवाहन...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, बुलडाणा :** शेतीतून अधिकाधिक उत्पादनासाठी निविष्ठांची (बियाणे, खते व किटकनाशके) गुणवत्ता अत्यंत महत्त्वाची आहे. शेतकऱ्यांनी निकृष्ट, भेसळयुक्त अथवा अनधिकृत उत्पादनांपासून बचाव करण्यासाठी बियाणे, खते व किटकनाशके खरेदी करताना काळजी घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी केले आहे. बियाणे, खते व किटकनाशके फक्त अधिकृत विक्रेत्याकडूनच खरेदी करावे. दर्जा व गुणवत्ता हमीसाठी सरकारने मान्यता दिलेल्या विक्रेत्यांकडूनच निविष्ठा खरेदी कराव्यात, खरेदीची पावती घेणे आवश्यक असून विना पावती खरेदी केल्यास तक्रार करण्याचा हक्क नाकारला जाऊ शकतो म्हणून बियाण्याचे पाकिट सिलबंद, लेबलयुक्त व मोहरबंद असावे. पिशवी, टॅंग आणि पावती पिकाची कापणी होईपर्यंत जपून ठेवावी, बियाणे व किटकनाशके खरेदी करताना त्यांच्या वापरण्याच्या अंतीम मुदतीची खात्री करावी, किंमत व वजनात फसवणूक टाळा, छापील किंमतीपेक्षा जास्त दराने विक्री अथवा कमी वजन दिल्यास त्वरित कृषि विभागाशी संपर्क साधावा. शंका आल्यास त्वरित तक्रार नोंदवा. कोणतीही तक्रार असल्यास तालुका कृषि अधिकारी, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी किंवा कृषि विभागाच्या टोल फ्री क्रमांकावर तक्रार नोंदवावी. एच.टी.बी.टी./बीटी-३ चोर बियाण्यांपासून दूर राहा, अनधिकृत बीटी बियाणे खरेदी करू नये. शिफारस केलेल्या तणनाशकांचा वापर मान्यता प्राप्त बियाण्यांसाठीच शिफारस केली असल्यास तणनाशकांचा वापर करावा. भेसळ, बनावट उत्पादने असल्यास तसेच याबाबत अनधिकृत विक्रीबाबत माहिती मिळाल्यास शेतकऱ्यांनी कृषि विभागास तात्काळ कळवावे. शेतकऱ्यांनी कृषी विभागाने दिलेल्या मार्गदर्शक तत्वांचे पालन केल्यास उत्पादनात वाढ होऊन आर्थिक नुकसान टाळता येईल. शेतीच्या सुरक्षिततेसाठी आणि शाश्वत शेतीसाठी शेतकऱ्यांनी काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी केले आहे.

# 'आरटीई' टप्पा क्र.४ प्रवेश मुदतवाढ ९ जून पर्यंत

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३१, ठाणे :** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता 'आरटीई २५%' ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेअंतर्गत टप्पा क्रमांक ४ मधील निवड झालेल्या विद्यार्थ्यांसाठी पालकांना प्रवेश पूर्ण करण्यास अंतिम मुदतवाढ देण्यात आली आहे. पूर्वी दि.२९ मे २०२५ पर्यंत मुदत देण्यात आलेली असताना, पालकांचा प्रतिसाद लक्षात घेता व काही अपूर्ण प्रवेश प्रक्रियेस संधी देण्यासाठी आता ही मुदत दि.०९ जून २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे.

**पालकांसाठी महत्त्वाची सूचना :**

टप्पा क्र. ४ मध्ये निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे पालक यांनी प्रवेश अद्याप पूर्ण केला नसेल, त्यांनी अलॉटमेंट लेटर व आवश्यक कागदपत्रांसह नजीकच्या पडताळणी केंद्रावर जाऊन प्रवेशाची प्रक्रिया पूर्ण करावी.

ही मुदतवाढ अंतिम असून, दि.०९ जून २०२५ नंतर कोणतीही मुदतवाढ दिली जाणार नाही. त्यामुळे सर्व पालकांनी वेळेत प्रवेश निश्चित करावा.

मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे आणि शिक्षणाधिकारी (प्राथमिक) बाळासाहेब राक्षे यांनी आवाहन केले की, शिक्षण हा प्रत्येक बालकाचा हक्क आहे. आरटीई अंतर्गत मिळणारी ही प्रवेश संधी सर्व पात्र विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावी, यासाठी पालकांनी वेळेत आणि नियमबद्ध पद्धतीने प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी.ठाणे जिल्ह्यातील सर्व पंचायत समिती व महानगर पालिका अंतर्गत एकूण ६२७ पात्र शाळा असून एकूण ११ हजार ३२० रिक्त जागा उपलब्ध होते व आतापर्यंत ८ हजार ५३९ प्रवेश झाले आहेत.अधिक माहितीसाठी संकेतस्थळ : https://student.maharashtra.gov.in तसेच मदतीसाठी स्थानिक शिक्षण विभाग / बीईओ कार्यालय येथे संपर्क करावा, असे आवाहन शिक्षण विभागामार्फत करण्यात येत आहे.